# मराठी भाषा व वाङ्मय मंडळ

## अहवाल २०२२-२३

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात मराठी भाषा व वाङ्मय मंडळ यांच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे मंडळाचे उद्घाटन गुरुपौर्णिमेच्या निमित्त साधून बुधवार दिनांक १३ जुलै २०२२ रोजी गुरुपौर्णिमा आणि 'यशस्वी व आनंदी जीवनाची प्रभावी मूल्ये' या विषयावर मा. डॉ. वरून माणिक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

मा. गोविंदजी ओझा, डायरेक्टर ऑफ परी रोबोटिक्स लिमिटेड, मुंबई यांचे दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी 'आजच्या युवकांपुढील आव्हाने' या व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला होता. या पंधरवाड्यामध्ये विद्यार्थ्यांचे कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्या पुढील प्रमाणे:

१. वक्तृत्व स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २३.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता
२. स्वरचित कविता सादरीकरण स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २४.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता
३. निबंध स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २५.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता
४. कथा कथन सादरीकरण स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २७.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता
५. कविता सादरीकरण स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २८.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता
६. गीत गायन स्पर्धा
   दिनांक व वेळ:- दि. २८.०१.२०२३ वेळ सकाळी ११.३० वाजता

दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी 'मराठी राजभाषा दिन' साजरा करत असताना दिनांक २७ फ्रेब्रूवारी ते १ मार्च या तीन दिवसात व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दिनांक २७ फेब्रूवारी रोजी 'माय मराठी आणि मातृभाषा' याविषयावर मा. उपेन्द्र जोशी, बदलापूर यांचे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी मा. अमृत देशमुख CA यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधून 'वाचन संस्कृती आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावर तर मा. श्री. मंदार जोशी, ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, यांचे 'साहित्याच्या माध्यमातून अर्थाजन आणि आनंद' या विषयावर मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ADARSH COLLEGE OF ARTS AND COMMERCE
KULGAON BADLAPUR ESTD 1995

डॉ. संगीता पांडे
प्र. प्राचार्या

डॉ. संदीप भेले
अध्यक्ष, मराठी भाषा व वाङमय मंडळ